**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर,शेतीच्या बांधावर व शेतकऱ्यांच्या पडीक जमिनीवरकृषि व पदुम विभागामार्फत वृक्ष लागवड कार्यक्रमास मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो)**
शासन परिपत्रक क्रमांक : फळबाग२०१६/प्र.क्र.१०५/रोहयो-५
नवीन प्रशासकीय इमारत, १६ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक - २२ डिसेंबर, २०१७.

**वाचा :-**

१. नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०११/प्र. क्र. १३२/रोहयो-१० अ, दिनांक २० जानेवारी २०१२.
२. नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०११/प्र. क्र. १२०/रोहयो-१० अ, दिनांक १४ मार्च २०१२.
३. शासन परिपत्रक क्रमांक: फळबाग२०१६/प्र.क्र.१०५/रोहयो-५ दि. १३ डिसेंबर, २०१६.
४. संचालक, फलोत्पादन यांचे पत्र क्र. कृआ/ फलो-२/ मग्रारोहयो/ मुदतवाढ/ २९३७/१७ दि. २९ नोव्हेंबर, २०१७.

**शासन परिपत्रक :-**

समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजनेअंतर्गत सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षामध्ये १,११,१११ हे. क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात येणार आहे. त्यानुसार सन २०१६-१७ मध्ये १६,४५१ हे. क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली आहे. उर्वरीत ९४,६६० हे. क्षेत्रावर सन २०१७-१८ मध्ये फळबाग लागवड करणे अपेक्षीत आहे. त्यापैकी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत ११,७९० हे. क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली आहे. सध्या शेतकरी फळबाग लागवड करण्यास उत्सुक असून त्यांनी पूर्व तयारी व नियोजन केलेले आहे. त्यामुळे "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत" फळबाग लागबाग लागवडीसाठी मुदतवाढ देण्याची विनंती संचालक (फलोत्पादन) यांनी संदर्भ क्र. ४ येथे नमूद पत्रान्वये केलेली आहे.



Scanned by CamScanner

त्याअनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०१७-१८ करिता फळबाग लागवडीचा कालावधी दिनांक १ जून, २०१७ ते दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत निश्चित करण्यात येत आहे. तथापि संबंधित शेतकऱ्यांकडे शाश्वत पाण्याची उपलब्धता आहे याची खातरजमा कृषि विभागाने करणे अनिवार्य राहील. याबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना संचालक फलोत्पादन, पुणे यांनी निर्गमित कराव्यात. याबाबत अनियमितता होणार नाही याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील. सदरची मुदतवाढ दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ पर्यंतच राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.**

**(डॉ. प्रमोद शिंदे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रती.

१. सर्व विभागीय आयुक्त
२. आयुक्त. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
५. प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर
६. आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
९. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर
१०. सर्व उप सचिव/ अवर सचिव/कक्ष अधिकारी नियोजन विभाग (रोहयो)
११. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१२. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१३. सर्व उप सचिव/ अवर सचिव/कक्ष अधिकारी नियोजन विभाग (रोहयो)
१४. निवड नस्ती रोहयो-५

c:\users\arc\desktop\kalpesh nagpur २०१७\फलोत्पादन मुदतवाढ.docx८

Scanned by CamScanner